# प्रेसनोट दिनांक ०३/०३/२०२०

## विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या परिणामकारक कारवाई

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडील कारवाई

सध्या पिंपरी-चिंचवड आयुक्तालयात वाहनचालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करुन वाहन चालवित असल्याचे दिसुन येत आहे. अनेकदा वाहनचालक नो-पार्किंग मध्ये वाहन लावतात, तसचे मोबाईलवर बोलत असताना गाडी चालवणे, ट्रिपल सिट, सिग्नल जम्प करणे त्याचप्रमाणे रॉंग साईडने बेशिस्त आणि वेडी वाकडी भरधाव वेगाने वाहन चालवतात. तसेच रिक्षा चालक हे निश्चित मर्यादेपेक्षा जास्त प्रवासी घेवुन रिक्षा चालवतात, त्यामुळे अपघात होऊन लोकांच्या जिवीताचे नुकसान होत असते. अशा वाहनचालकांवर वचक बसावा याकरीता पिंपरी-चिंचवड आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडुन दि.२४/०२/२०२० ते दि.०१/०३/२०२० पर्यंत विशेष मोहिम राबवुन खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र | शिर्षक | एकुण केसेस | एकुण दंड |
|---|---|---|---|
| १ | जामर/नो-पार्किंग | २९८४ | ६१९६०० |
| २ | मोबाईल टॉकींग | ८९३ | १७८६०० |
| ३ | ट्रिपल सिट | ८१४ | १६२८०० |
| ४ | रिक्षा कारवाई | ६८८ | २२१८०० |
| ५ | सिग्नल जम्पींग | ६७६ | १३५२०० |
| ६ | रॉंग साईड | ६४४ | ६४४००० |
| | एकुण | ६६९९ | १९६२००० |

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड मा.पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त निलीमा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यापुढे देखील वाहतुक शाखेकडील विशेष मोहिमे दरम्यान मोठया प्रमाणात कारवाई करुन जास्तीत जास्त वाहनांची तपासणी करुन त्यांचेवर ई-चलनाव्दारे कारवाई केलेली असेल, तर दंड वसुल करुन कारवाई केली जाणार आहे. वाहतुकीचे नियम न पाळणारे वाहनचालक निदर्शनास आल्यास त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच वाहतुक शाखेकडुन सर्व वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहतुकीचे सर्व नियम पाळावेत. जेणेकरुन भविष्यात अपघाताचे प्रमाण कमी होईल.

(प्रसाद गोकुळे)
पोलीस निरीक्षक,नियो
वाहतुक शाखा,पिंपरी-चिंचवड

# प्रेसनोट दि.०३/०३/२०२०

## बेवारस वाहनांनवर करण्यात येणारी कारवाई

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडुन करण्यात येणारी कारवाई

पिंपरी-चिंचवड वाहतुक शाखेस असे निर्दशनास आले आहे की, शहरामध्ये सार्वजनिक रस्त्यावर मोठया प्रमाणात दुचाकी व चारचाकी वाहने बेवारसरित्या उभी असलेली दिसुन आलेली आहेत. त्यामुळे सार्वजनिक रस्त्यवर अनेक वेळा वाहतुक कोंडी निर्माण होवुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाहतुक शाखा पिंपरी चिंचवड व उप प्रादेशिक परिवहन विभाग पिंपरी चिंचवड असे संयुक्तरित्या महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक : न्यायप्र-०८१८/प्र.क्र.१०५/पोल-८ मंत्रालय, मुंबई दि.०९/१०/२०१८ अन्वये आदेश झाले असुन दि.०६/०३/२०२ रोजी पासुन अशा बेवारसरित्या सार्वजनिक रस्त्यावर उभी असलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांवर टोईंग व्हॅनव्दारे कायदेशीर कारवाई करणार आहेत.

तरी शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपली वाहने सार्वजनिक रस्त्यावर बेवारसरित्या उभी न करता आपल्या पार्किंगमध्ये पार्क करावीत. जेणेकरुन वाहतुकीची कोंडी होवुन अपघात होणार नाहीत.

(प्रसाद गोकुळे)
पोलीस निरीक्षक,नियो
वाहतुक शाखा,पिंपरी-चिंचवड